“अनुसूचित जाती-जमाती व महिला उद्योजकांच्या आर्थिक विकासात स्टँड-अप इंडिया या योजनेच्या भूमिकेचा एक अभ्यास”

(संदर्भ: नांदेड जिल्हा)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड. मानव विज्ञान विद्याशाखेअंतर्गत अर्थशास्त्र विषयातील विध्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी नियोजित संशोधनासाठी सादर करावयाचा आराखडा.

-: संशोधक :-

जयवंत उत्तम आठवले

संशोधन केंद्र पिपल्स महाविध्यालय नांदेड.

-: मार्गदर्शक :-

प्रा. डॉ. शिवाजी दौलतराव भागानगरे

सहाय्यक प्राध्यापक, संशोधन मार्गदर्शक,

अर्थशास्त्र विभाग,

श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कंधार.

-: संशोधन केंद्र :-

पिपल्स महाविद्यालय नांदेड.

सप्टेंबर - २०२३

“अनुसूचित जाती-जमाती व महिला उद्योजकांच्या आर्थिक विकासात स्टँड-अप इंडिया या योजनेच्या भूमिकेचा एक अभ्यास” (संदर्भ: नांदेड जिल्हा.)

१. प्रस्तावना

भारताचा सामाजिक आर्थिक व शैक्षणिक विकास जसा वेगाने वाढत आहे. तसतसे भारतातील संभाव्य उद्योजक मोठ्या गटांचा विशेषता देशातील अनुसूचित जाती व जमातीच्या आशा आकांक्षा आणि अपेक्षा वाढत आहेत . स्वतःच्या आर्थिक विकासाची भरभराट आणि प्रगती होण्यासाठी त्यांना स्वतःचा उद्योग उभा करायचा आहे. असे उद्योजक देशभरात आहेत. स्वतःसाठी आणि त्यांच्या कुटुंबासाठी काहीतरी करू शकतात याविषयी कल्पना घेऊन प्रयत्न करीत आहेत. याच अनुसूचित जाती-जमाती व महिला उद्योजकांची स्वप्न प्रत्यक्ष पूर्ण करण्यासाठी आणि त्यांच्या उर्जेला आणि उत्साहाला पाठिंबा देऊन त्यांच्या मार्गातील अडथळे दूर करण्यासाठी केंद्र सरकारने त्यांच्या आर्थिक व सामाजिक विकास साध्य करण्यासाठी स्टँड-अप इंडिया ही योजना सुरू केली आहे.

त्याचप्रमाणे राज्य सरकार देखील राज्यातील अनेक उद्योजक ज्यांचा आर्थिक व सामाजिक विकास मागासलेला आहे, अशा तरुण उद्योजकाला राज्य सरकार ह्या योजनेच्या माध्यमातून स्वयंरोजगारासाठी आत्मनिर्भर व स्वावलंबी बनविण्यासाठी राज्य सरकार त्या उद्योजकांना कर्ज पुरवठा करते. महाराष्ट्र सरकारच्या प्रत्येक जिल्ह्यासाठी अनुसूचित जाती-जमातीसाठी कर्ज योजना आहेत . उदा, महात्मा फुले विकास महामंडळ, वसंतराव नाईक महामंडळ, अण्णाभाऊ साठे महामंडळ, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर उदय योजना या योजनेच्या माध्यमातून अनुसूचित जाती व जमाती आणि महिला व पुरुषांना कर्ज पुरवठा केला जातो.

भारताच्या वाढत्या औद्योगीकरणात सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम क्षेत्राला महत्त्व आहे. एक असे क्षेत्र आहे जे उद्योगाच्या विकासाबरोबर देशभरात लाखो लोकांना रोजगार देऊन देशाच्या विकासाची समाजिक उद्दिष्टे पूर्ण करण्याचे कार्य करते. देशाच्या GDP मध्ये सूक्ष्म, लघु उद्योजकाला वाटा ८ % आहे. कारखानदारी क्षेत्राच्या योगदानात लघु उद्योजकाचे योगदान सुमारे २५ % आहे व देशाच्या एकूण निर्यातीत या क्षेत्राचे योगदान ४० % आहे. या सूक्ष्म व लघु उद्योजकामध्ये २६१ उपक्रमांमध्ये देशातील ५९५ लाख व्यक्ती रोजगारात गुंतले आहेत. हे क्षेत्र स्वयंरोजगारासाठी तसेच मजुरी वर्गासाठी एक

अत्यंत महत्त्वाचे क्षेत्र आहे. अशा क्षेत्रात रोजगार निर्मितीसाठी उद्योजकांना मोठ्या प्रमाणावर संधी निर्माण होतात. भारतात बेरोजगारी मोठ्या प्रमाणात आढळून येते. कित्येक एससी, एसटी व महिला कामगारांना रोजगार मिळत नाही. २०११-१२ च्या एन एस एस ओ (NSSO) सर्वेक्षणानुसार पुरुष महिला बेरोजगार पुरुष ४ % व स्त्रिया ८.७ % होता. लघु मध्यम व्यवसायात उद्योजकांना कर्ज घेण्यासाठी, त्यांना प्रशिक्षणासाठी, उत्पादनासाठी तांत्रिक साहय मदत पतपुरवठ्याच्या बाबतीत माहिती पुरवणे, पथ पुरवठ्याची हमी देणे इत्यादी उपक्रम राज्य सरकार राबवत आहे.

२. संशोधन विषयाची निवड / विषयाची गरज :

नांदेड जिल्ह्यातील एससी, एसटी व महिला उद्योजकांना उत्पादन, व्यापार, सेवा उद्योग तसेच कृषी क्षेत्राशी निगडित उपक्रमामधील उद्योगासाठी उदा, मत्स्यपालन, मधमाशी पालन, कुकुट पालन, पशुधन संगोपन, कृषी उद्योग, दुग्ध व्यवसाय, केंद्रीय अन्न आणि कृषी प्रक्रिया, आणि त्यांना समर्थन देण्याऱ्या सेवा या व्यवसायाच्या माध्यमातून आपण वस्तू उपक्रम, सेवा उपक्रम, वाहन उद्योग, तयार कपडे उद्योग, संगणक उद्योग, चमडा उद्योग ह्या व्यवसाय आधारित उद्योजकांना अनुसूचित जाती, जमाती व महिला उद्योजकाच्या स्टँड-अप इंडिया योजनेचा लाभ हा रोजगार निर्मिती, त्यांचा आर्थिक व समाजिक विकासात या योजनेच्या योगदानाची भूमिका अभ्यासनासाठी या विषयाची निवड केली.

३. संशोधन समस्याः विषय निवडीची कारणे / हेतू :

भारताची सतत वाढणारी लोकसंख्या ही देशापुढील असणारी एक समस्या आहे. कारण सन २००१ च्या जणगणनेनुसार भारताची लोकसंख्या १०२.७ कोटी होती ती सन २०११ मध्ये १२५ कोटी एवढी झालेली आहे. तर सध्या ती १३२ कोटी ऐवढी अवाढव्य झालेली आहे. तसेच जागतिकीकरणाचा भारतातील विविध क्षेत्रात झालेला अनुकूल-प्रतिकूल परिणाम, बाजारातील विविध व खुल्या किंमतीचे चढ-उतार स्पर्धात्मक युग त्यातच महाराष्ट्राचा विचार केला असता महाराष्ट्रात सुशिक्षित बेरोजगारांची रोजगार केंद्रातील नोंदणी संख्या ४० लाख आहे. याशिवाय विविध शाखेनुसार शाळा, कॉलेज मधून दरवर्षी सुशिक्षितांचे लोंढे बाहेर पडत आहेत. त्यामुळे अशा बेकार, दारिद्रयात जीवन जगत असलेल्या बेकार सुशिक्षितांची स्वयंरोजगाराकडे वळावे यासाठी भारत सरकारच्या व राज्य सरकारच्या त्या–त्या खात्यामार्फत राष्ट्रीयकृत बँका, विविध महामंडळे ,राज्य सरकार

महाराष्ट्र शासन महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य या खात्यामार्फत व इतर खात्यामार्फत, या खात्याची विविध महामंडळ व सहकारी बँका, पतसंस्था यांच्यामार्फत कर्जपुरवठा केला जात असतो. याप्रमाणे देशातील ग्रामीण भागापासून ते शहरी भागातील गरजूंना त्यांची पत परिक्षण करून कर्ज पुरवठा करून देशातील राज्यातील दारिद्रय / बेकारी दूर केले जात असते.

देशाच्या निरनिराळ्या क्षेत्रात अधिकाअधिक प्रगती घडून येत आहे. बँकिग व्यवसाय / क्षेत्र, केंद्र सरकार व राज्य सरकारची महामंडळे देखील याला अपवाद नाही. त्यानुसार ग्रामीण व शहरी भागातील विविध जाती-जमातीच्या लोकांमधील बेकारी दारिद्रय दूर व्हावे व त्यांची आर्थिक प्रगती होउन त्या त्या जाती-जमातीच्या लोकांना चांगले जीवन जगता यावे. यासाठी महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य खात्याअंतर्गत विविध महामंडळे उदा.

1) महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ
2) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळ
3) संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार महामंडळ
4) वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ
5) महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग विकास महामंडळ

आणि केंद्र शासनाची स्टँड-अप इंडिया इ.

या विविध महामंडळाची भूमिका / कार्ये ही अत्यंत महत्वाची आहेत. अर्थात ग्रामीण व शहरी भागाची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व इतर सर्वांगीण प्रगती होण्यास भारत सरकार केंद्र सरकारच्या विविध योजना, राज्य सरकार राज्य सरकारच्या विविध योजना, केंद्र राज्य सरकारची प्रत्येक खाती / विभाग उदा. महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य खात्याअंतर्गत विविध महामंडळे, सहकारी संस्था सह. बँक, पतसंस्था इ. मार्फत मदत होत असते. इ. बाबतचा विचार करून मी आपल्या भारत देशाच्या महाराष्ट्र राज्यात राहतो. महाराष्ट्रातील नांदेड जिल्हयातील रहिवासी असल्याने महाराष्ट्र शासनाच्या व केंद्र शासनाच्या स्टँड-अप इंडिया आणि विविध महामंडळाचा विचार करून त्या त्या योजनेची व महामंडळाची उद्दिष्टे, कार्यप्रमाणाली, धोरणे, कार्ये इ. ही रचनेनुसार भिन्न भिन्न लोकांच्या प्रगतीचा आढावा घेऊन त्यांची उत्तरोत्तर आर्थिक व समाजिक प्रगती कशी झाली ती अभ्यास करणे.

४. संशोधनाची उद्दिष्टे

1. स्टँड-अप इंडिया या योजनेचा सखोल अभ्यास करणे.
2. स्टँड-अप इंडिया या योजनेच्या अंतर्गत अनुसूचित जाती-जमाती व महिला उद्योजकता विकासातील योगदानाचा अभ्यास करणे.
3. स्टँड-अप इंडिया या योजनेमुळे नांदेड जिल्ह्यातील झालेल्या रोजगार निर्मितीचा अभ्यास करणे.
4. एससी,एसटी व महिला उद्योजकांच्या लाभार्थ्यांना लाभ घेण्यात येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.
5. स्टँड-अप इंडिया या योजनेमुळे एससी,एसटी व महिलांच्या आर्थिक विकासातील व सामाजिक विकासातील झालेल्या बदलाचा अभ्यास करणे.

५. संशोधनाची गृहीतके

1. स्टँड-अप इंडिया या योजनेमुळे नांदेड जिल्ह्याच्या आर्थिक सामाजिक विकासात योगदान ठरत आहे.
2. स्टँड-अप इंडिया या योजनेमुळे नांदेड जिल्ह्यातील उद्योगांच्या विकासातून रोजगार निर्मिती होत आहे.
3. एससी, एसटी महिला उद्योजक यांना स्टँड -अप इंडिया या योजनेचा लाभ घेण्यासाठी अनेक समस्या येत आहेत.
4. स्टँड-अप इंडिया मुळे नांदेड जिल्ह्यातील सूक्ष्म लघुउद्योगांचा उदय व विकास होत आहे.
5. स्टँड-अप इंडिया मुळे नांदेड जिल्ह्यातील एससी,एसटी व महिलांच्या आर्थिक व समाजिक विकासात बदल होत आहे.

६. संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जाती-जमाती व महिला उद्योजकांना उद्योग स्थापन करण्यासाठी आर्थिक सहाय्य करणाऱ्या स्टँड-अप इंडिया या योजनेचा अभ्यास पूर्ण संशोधन करण्यासाठी ५ एप्रिल २०१६ या दिनांकापासून ते २०२२-२३ पर्यंतचा कालखंड निवडण्यात आला आहे. अनुसूचित जाती-जमाती व महिला उद्योगांच्या आर्थिक विकासात स्टँड-अप इंडिया योजनेच्या भूमिकेचा एक अभ्यास (संदर्भ: नांदेड जिल्हा) या प्रबंधाचे संशोधन करण्यासाठी सन २०१६ -१७   ते २०२२ - २३   या आर्थिक वर्षाचे वित्तीय वर्षाचे नमुना निवड सहेतुक नमुना निवडीनुसार सर्वेक्षण करणार आहे. कारण आर्थिक सर्वेक्षण करण्यासाठी मागील सहा वर्षाचा चढ-उताराचा आढावा घेऊन त्यानुसार आर्थिक सर्वेक्षण करून संशोधन पूर्ण करणार आहे. प्रस्तुत संशोधनासाठी लागणारा कालखंड व खर्चाचा विचार करता नांदेड जिल्ह्यातील ह्या योजनेच्या संशोधनाची व्याप्ती २०१६ -१७ ते २०२२-२३ या कालावधीची मर्यादा विचारात घेऊन हे संशोधन पूर्ण करण्यात येणार आहे.

७. संशोधन पद्धती

अनुसूचित जाती-जमाती व महिला उद्योजकांना व्यवसायासाठी अर्थसहाय्य करणाऱ्या स्टँड-अप इंडिया या योजनेचा एक सूक्ष्म अभ्यास करत आसताना वर्णनात्मक व विश्लेषणात्मक या संशोधन पद्धती चा उपयोग करणार आहोत . त्या पद्धती मध्ये प्राथमिक साधने व दुय्यम साधने यांचा उपयोग करण्यात येईल.

१. प्राथमिक साधने

मुलाखत, भेट, प्रश्नावली, सर्वेक्षण या पद्धतीचा वापर करून माहिती संकलित करण्यात येणार आहे. स्टँड-अप इंडिया च्या माध्यमातून उद्योग सुरू केलेल्या उद्योजकांची प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात प्रत्यक्ष भेट देऊन संशोधनासाठी आवश्यक ती प्राथमिक माहिती गोळा करण्यात येणार आहे.

२. दुय्यम साधने

योजनेचे वार्षिक अहवाल, महाराष्ट्र शासनाचा कर्ज पुरवठा करणारे विविध महामंडळाचे सर्वेक्षण तसेच बँकेतील उद्योजकाला दिलेली कर्जाची माहितीचा वार्षिक अहवाल, विविध कागदपत्रे, संदर्भ मासिके, पुस्तके, बँक अधिकारी, कर्जदार उद्योजक व यांच्याकडून

मिळणारी आवश्यक ती माहिती संकलित करून योजनेच्या माध्यमातून झालेल्या प्रगतीचा अभ्यास करण्यात येणार आहे. या प्रबंधात विषयाच्या अभ्यासासाठी प्राथमिक मुलाखत, प्रश्नावली, भेट आणि साध्या यादृच्छिक नमुना पद्धतीद्वारे आणि दुय्यम माहितीसाठी विविध कर्ज पुरवठा करणारे विविध महामंडळाची वार्षिक अहवाल संदर्भ पुस्तके, विविध कागदपत्रे, जनरल, मासिके, प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेची वार्षिक अहवाल, बँकेकडून मिळणारी माहिती इत्यादी माहिती संकलित करता येईल त्याचबरोबर सामग्रीचे विश्लेषण करण्यात येणार आहे व साधना बरोबरच सारणी, तक्ते ,आलेख इत्यादी साधनांचा वापर करण्यात येणार आहे.

८. नमुना निवड पद्धती

समग्र पद्धती, पूर्ण गणना पद्धती, राशी पद्धती, किंवा नमुना पद्धती वापरून सामग्री संकलित करता येते. त्यानुसार अनुसूचित जाती-जमाती व महिला उद्योजकांना नवीन उद्योग स्थापन करण्यासाठी स्टँड-अप इंडिया या योजनेच्या उपलब्धता विचार करणार आहोत. सहेतूक उद्देश पूर्ण नमुना निवड जेव्हा एखादा संशोधन कर्ता एखादे विशिष्ट उद्दिष्ट समोर ठेवून जाणीवपूर्वक समग्रातिल काही एककांची निवड करतो त्याला सहेतुक नमूना निवड असे म्हणतात. या सहेतूक नमुना निवड पद्धतीत मी अनुसूचित जाती-जमाती व महिला उद्योगाच्या आर्थिक विकासात स्टँड-अप इंडिया (संदर्भ: नांदेड जिल्हा) या संशोधनासाठी वापर करणार आहे. नांदेड जिल्ह्यात एकूण सोळा (१६) तालुके आहेत, प्रत्येक तालुक्यातून २५ लाभार्थ्यांची १६ × २५ = ४०० नमुना निवड केली जाणार आहे. या साठी असंभव्यता नमुना निवड पद्धतीतील सहेतुक नमूना निवड पद्धतीचा वापर करून संशोधन पूर्ण करणार आहे.

संदर्भसूची

1) Entrepreneurship start-up India and stand up India (Author pranabnanda Rath. Surjue pandita)

2) डॉ. नंदकुमार नाईक ,- लोकप्रशासन व्यवस्थापन

3) डॉ. प्रदीप आगलावे,- सामाजिक सांशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे

4) प्रा.डॉ.सोपानदेव पीसे,- अध्यापन व सांशोधन अभियोग्यता

5) www.standupmitra.in(portal)

6) “नाशिक जिल्ह्यातील विविध मागासवर्गीय जाती-जमातीच्या आर्थिक व सामाजिक विकासात शासनाचे योगदान” 2009-10 ते 2018-19 संशोधक: संजय दत्तात्रय बावीसकर

7) डॉ. अभिजीत राठोड,- भारतीय अर्थव्यवस्था -2019.

8) डॉ. किरण जी. देसले,- दीपस्तंभ आवृत्ती -2016-17.

9) NSSO 68 वी फेरी सवेक्षण 2011-12.

संशोधन मार्गदर्शक **संशोधक**

प्रा.डॉ.शिवाजी दौलतराव भागानगरे **जयवंत उत्तम आठवले**

सहाय्यक प्राध्यापक,

संशोधन मार्गदर्शक,अर्थशास्त्र विभाग,

श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,कंधार.